C-0

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

क्र. प्र.ले/वित्त/प्रकल्प/ ७५ दिनांक: २४. ११ .२०२१

विषय: दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणाऱ्या खरेदीची मर्यादा ३ लाखावरून रू.१० लाखापर्यंत वाढविणेबाबत.

संदर्भ: १. प्र.ले./एफआरडी/एक/४१ दि.२६.०९.२०११

२. शासन निर्णय क्रमांक: मातंस /नस्ती-२०१२/प्र.क्र./२७३/३९ दिनांक:-२६.११.२०१४.

3. Dir.(ES&P)/3210/II dated 07.09.2015

४.शासन निर्णय क्रमांक: सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दिनांक:-२० मे २०२१.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती-२०१२/प्रक्र-२७३/३६, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २६.११.२०१४ अन्वये ३लाखांपेक्षा अधिक रकमेच्या कामांसाठी/पुरवठ्यासाठी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्याच्या सूचना दिल्या होत्या. सदर सूचनांच्या अनुषंगाने , महापालिकेतील आकस्मितपणे उद्भवणाऱ्या अनभिज्ञ कामांसाठी मागविण्यात आलेल्या/येणाऱ्या ई-निविदांच्या कंत्राटांमधील प्रत्येक काम/कार्यादेशाची मर्यादा रू.३लाखांपर्यंत ठेवण्याच्या सूचना संदर्भ क्र.३ अन्वयेच्या परिपत्रकान्वये जारी केल्या आहेत.

आता शासनाने शासन निर्णय क्र. : भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग-४ दिनांक:-०७ मे २०२१ व शासन निर्णय क्रमांक: सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दिनांक:-२० मे २०२१ अन्वये शासकिय विभागांकडून दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणाऱ्या खरेदीची/कामाची मर्यादा रू.३ लाखावरून रू.१०लाखापर्यंत वाढविली असल्याने, महापालिकेतील आकस्मितपणे उद्भवणाऱ्या अनभिज्ञ कामांसाठी सार्वजनिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन मागविण्यात आलेल्या /येणाऱ्या निविदांच्या कंत्राटांमध्ये अंतर्भूत असलेले प्रत्येक काम/कार्यादेशाच्या मर्यादा रू.१०लाखांपर्यंत वाढविण्यात येत आहे. तथापी, मोठया रकमेच्या कामांची लहान-लहान कार्यादेशांमध्ये विभागणी काटेकोरपणे टाळण्यात यावी.



Scanned with CamScanner

२. तथापी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या इतर कलमासह कलम ७२ मध्ये सुधारणा होईपर्यंत, परिपत्रक क्र. प्र.ले./एफआरडी/एक/४१ दि.२६.०९.२०११ अन्वये देण्यात आलेले निदेश कायम असतील.

उपरोक्त सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत सर्व खातेप्रमुख/सहाय्यक आयुक्त/रूग्णालय अधिष्ठाता/ वैद्यकिय अधिक्षक यांनी दक्षता घ्यावी.

(प्रदिप पडवळ)
प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.

(राजेंद्रकुमार तळकर)
उप आयुक्त (पा.सु.)

(सुधीर गजरगावकर)
संचालक (अ.से.व प्र.)

(पी.वेलरासू)
अति.आयुक्त(प्रकल्प)

(इ.सि.चहल)
मान.महानगरपालिका आयुक्त

Scanned with CamScanner